ePaper

# जितेंद्र आव्हाड यांच्या अडचणीत मोठी वाढ, दोन गुन्हे दाखल



॥ वर्ष - 7 । अंक - 339 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 30 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- टी-२० वर्ल्ड कपपूर्वी सर्वांनाच धक्का!
- वसंत मोरे प्रचंड संतापले!
- तीन दिवसांत माफी मागा!
- "काँग्रेसशी कायमचा घरोबा नाही"!


## लोकसभा निवडणुकीच्या निकालाची उत्कंठा

# महाराष्ट्रात 4 जूनला राजकीय भूकंप?

### महाविकास आघाडी, महायुतीमधील बड्या नेत्यांच्या मुंबईत बैठका

**।पुणे ।महाईन्यूज**

**महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीचे सर्व टप्पे पूर्ण झाले असून, आता सर्वांच्या नजरा 4 जूनकडे लागल्या आहेत. कारण चार जूनला लोकसभा निवडणुकांचे निकाल लागणार आहेत. याचबरोबर निकालानंतर पुढे काय? हे ठरवण्यासाठी महायुती, महाआघाडीतील पक्ष आपआपल्या महत्त्वांच्या नेत्यांबरोबर बैठकांवर बैठका घेत आहेत.**

दरम्यान महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीत गेल्या दोन वर्षांमध्ये मोठा बदल झाला आहे. या काळात पहिल्यांदा शिवसेना फुटली. भाजपने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देत उद्धव ठाकरे यांना जबरदस्त धक्का दिला. यानंतर गेल्या वर्षी शिवसेना फोडूनही लोकसभेबाबत खात्री नसल्याने भाजपने राष्ट्रवादीही फोडली असे आरोप केले जातात. त्यामुळे या निवडणुकीत महायुती जास्त जागा जिंकत वर्चस्व गाजवणार की पक्ष फुटूनही शरद पवार आणि उद्धव ठाकरे जास्त जागा जिंकत भरारी घेणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



#### निकाल ठरवणार फडणवीसांचे राजकीय वजन

तीन पक्षांची आघाडी असूनही भाजपने यावेळी जवळपास 35 जागा लढवण्याची तयारी केली होती. त्यासाठी ते आग्रही होते. परंतू, यावेळी एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी बरोबर असल्याने त्यांना 28 जागा मिळाल्या. या निवडणुकीतील काळात लोकांचा कल पाहता भाजप मागच्या वेळी जिंकलेल्या तितक्या जागा जिंकणार की, मागच्या वेळी जिंकलेल्या जागांमधील काही जागा गमावणार यावर महाराष्ट्र भाजपमधील अनेक घडामोडी अवलंबून असणार आहेत.

कारण गेल्या दहावर्षांपासून महाराष्ट्र भाजपची सूत्रे देवेंद्र फडणवीस यांच्या हातात आहेत. त्यामुळे जर भाजपने जास्त जागा जिंकल्या तर फडणवीसांचे राजकीय वजन आणखी वाढणार आहे. पण, एकनाथ शिंदे-अजित पवार यांना बोरबर घेतल्याने भाजपला फटका बसल्यास फडणवीसांचे पक्षांतर्गत विरोध सक्रिय होतील. त्यामुळे फडणवीसांसाठी ही निवडणूक महत्त्वाची आहे.

#### बारामती कुणाची?

**गेल्या वर्षी जुलैमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतल्याने राष्ट्रवादीसह पवार कुटुंबामध्येही फुट पडली.**

#### देशभरात उत्सुकता

**दरम्यान, यावेळी शरद पवार यांच्या जवळचे असलेले अनेक नेते त्यांना सोडून गेले. अशा परिस्थितीतही शरद पवार यांनी महाराष्ट्र पिंजून काढत जोरदार टक्कर दिली. त्यामुळे या निवडणुकीत जर शरद पवार यांची जादू चालली तर अजित पवारांच्याबरोबर गेलेले अनेक आमदार आणि नेते पुन्हा शरद पवारांकडे येण्याची शक्यता आहे.**

## पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणात यश!

### तीन कार जप्त; पोलिसांची अत्यंत वेगाने कारवाई

**।पुणे। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणात पुणे पोलिसांना मोठं यश मिळालं आहे. या प्रकरणात वापरण्यात आलेल्या तिन्ही कार अखेर पोलिसांनी जप्त केल्या आहेत. या कार या प्रकरणातील मोठा पुरावा आहेत. या वाहनांची पोलिसांकडून कसून चौकशी करण्यात येणार आहे. तसेच या कारमध्ये काही पुरावा मिळतोय का? याचीही तपासणी पोलीस करणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.**

दरम्यान, या अपघात प्रकरणात रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी दोन डॉक्टरांना निलंबित करण्यात आलं आहे. एका वॉर्ड बॉयलाही निलंबित करण्यात आलं आहे. तसेच ससूनच्या डीनला सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे. पुणे अपघात प्रकरणात आतापर्यंत तीन गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.



ज्या कारने अपघात करण्यात आला, ती पोर्शे कार पोलिसांनी जप्त केली आहे. या प्रकरणानंतर विशाल अग्रवाल हा फरार झाला होता. तो छत्रपती संभाजी नगरला गेला होता. छत्रपती संभाजीनगरला जाताना त्याने किया गाडी वापरली होती. ही गाडीही जप्त करण्यात आली आहे. तसेच ड्राव्हरच्या अपहरणासाठी वापरण्यात आलेली मर्सिडिज कारही जप्त करण्यात आली आहे. पोलिसांसाठी ही तिन्ही वाहने मोठा पुरावा असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

#### मोबाईल जप्त

ड्रायव्हर गंगारामचा अग्रवाल पितापुत्रांनी काढून घेतलेला मोबाइल गुन्हे शाखेने जप्त केला आहे. विशाल अग्रवाल याच्या घरातून मोबाईल जप्त करण्यात आला. अग्रवालने ड्रायव्हरला घरात कोंडून ठेवलं होतं. तेव्हा मोबाईल जप्त केला होता. पोलिसांनी आज अग्रवाल याच्या घरात सर्च ऑपरेशन केल्यानंतर हा मोबाईल जप्त केला आहे.

#### दोघे निलंबित, एक सक्तीच्या रजेवर

दरम्यान, पुण्यातील ब्लड सँपल प्रकरणी अखेर डॉ. विजय तावरे, डॉ. श्रीहरि हरनोर यांना वैद्यकीय शिक्षण विभागाने निलंबित केलं आहे. तसेच या प्रकरणी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल दिला आहे. त्यानंतर बीजे मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे. त्यांच्या जागी बारामतीच्या अहिल्या देवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के यांच्याकडे अतिरिक्त भार सोपवण्यात आला आहे.

## तुम्हाला फक्त रवींद्र धंगेकरच दिसतात का?

# वसंत मोरे प्रचंड संतापले!

## पोर्श कार अपघात प्रकरणावरून चांगलंच वातावरण तापलं

। पुणे । महाईन्यूज ।

**पुण्यातील पोर्श कार अपघात प्रकरणावरून चांगलंच वातावरण तापलं आहे. विरोधकांनी या मुद्द्यावरून रान उठवलं आहे. तर दुसरीकडे या प्रकरणावरून राजकीय नेत्यांमध्येच जुंपली आहे. हे प्रकरण कुणी उजेडात आणलं यावरून श्रेयवादही सुरू झाला आहे.**



### नियम शिथिल करा

पुण्याच्या प्रकरणात कुठल्यातरी मंत्र्याने फोन केल्याचं आंबेडकर म्हणाले. अग्रवाल नावाच्या बिल्डरची भागीदारी कुठल्या-कुठल्या राजकीय पक्षांसोबत आहे, कुठल्या राजकीय मंत्र्यांसोबत आहे किंवा कुठल्या राजकीय मंत्र्यांचे पैसे अडकलेले आहेत, याची चौकशी करावी आणि चौकशी करून कोणी फोन केला हे पोलिसांना विचारावं, असा सल्ला आंबेडकरांनी दिला आहे. दुसरं म्हणजे अपघात वाढत चालले आहेत. त्यामुळे अल्पवयीन आहे म्हणून त्याला कमी शिक्षा हा नवीन नियम आला आहे. हा नियम शिथिल करायला हवा. 18 वर्षा खालील मुलांना बार किंवा पबमध्ये प्रवेश दिला जाऊ नये, त्यांना प्रवेश देणाऱ्या मालकाला 3 वर्षाची शिक्षा करावी, त्याचा परवाना रद्द करावा आणि दहा लाख रुपये दंड करावा, अशी तरतूद परवण्यामध्येच करावी असा सल्ला आंबेडकरांनी दिला आहे.

पुणे पोर्श अपघात प्रकरणी फक्त काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांच्यावरच मीडिया फोकस करत असल्याने वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि पुणे लोकसभेतील उमेदवार वसंत मोरे चांगलेच संतापले आहेत. तुम्हाला फक्त धंगेकरच दिसतात का? भरपूर ठिकाणी तुम्हाला धंगेकर दिसत आहेत. जो विषय चालला त्याबद्दल विचारा. आम्ही या घटनेचा निषेध केला. पहिल्यांदा आम्हीच आवाज उठवला. मीडियाला फक्त धंगेकरच दिसतात, असं म्हणत वसंत मोरे यांनी आपला संताप व्यक्त केला.

शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या हातून डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचा फोटो फाडला गेला. त्यामुळे वसंत मोरे चांगलेच आक्रमक झाले आहेत. वसंत मोरे यांच्या नेतृत्वात आज पुण्यात वंचित बहुजन आघाडीने जोरदार आंदोलन करत जितेंद्र आव्हाड यांचा निषेध नोंदवला. यावेळी त्यांनी जितेंद्र आव्हाड यांच्या अटकेची मागणीही केली. जितेंद्र आव्हाड यांना मनोविकार तज्ज्ञाला दाखवा. मग शांत होईल. त्यांना मानसोपचाराची गरज आहे, असा हल्लाच वसंत मोरे यांनी चढवला.

### चुका करतात, माफी मागतात

जितेंद्र आव्हाड हे राज्यातील शांतता बिघडवण्याचं काम करत आहेत. जोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत आव्हाड सुधारणार नाहीत. दरवेळी चुका करतात आणि माफी मागतात. जितेंद्र आव्हाडांनी काही पहिल्यांदाच माफी मागितली नाही. त्यांनी बाबासाहेबांचा फोटो फाडला आहे. त्याचे काय परिणाम होणार हे त्यांना महाराष्ट्रात फिरताना जाणवणार आहे, असं वसंत मोरे म्हणाले.

### मनातून मनुस्मृती काढा

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनीही जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका केली आहे. आव्हाडांचं आंदोलन हा शरीरातून मनुस्मृती घालावण्याचा प्रकार आहे. मनातून मनुस्मृती गेली का? मनातून जोपर्यंत मनुस्मृती जात नाही, तोपर्यंत आपण कृती करताना ती डोळ्स राहत नाही, अशी टीका प्रकाश आंबेडकरांनी केली आहे. आव्हाडांनी धर्मवादी, निरपेक्षवादी, धर्मवादी आहे. असा ढिंढोरा पिटला तरी आधी त्यांनी मनातून मनुस्मृती काढावी, असा सल्लाही आंबेडकरांनी आव्हाडांना दिला आहे.

---

## पोर्श अपघात प्रकरण; 2 डॉक्टर निलंबित, डॉ. काळे सक्तीच्या रजेवर

## ब्लड सॅंपल बदलल्या प्रकरणी दोन डॉक्टर आणि एका वॉर्डबॉयला घरचा रस्ता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे पोर्श अपघात प्रकरणात सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. या अपघात प्रकरणात ब्लड सॅंपल बदलल्या प्रकरणी अखेर दोन डॉक्टर आणि एका वॉर्डबॉयला घरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. तिघांनाही निलंबित करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या अहवालानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाने हा मोठा निर्णय घेतला आहे. या तिघांनाही पोलिसांनी आधीच अटक केली आहे. त्यांची कसून चौकशी केली जात आहे. या तिघांना ब्लड सॅंपल बदलण्यासाठी विशाल अग्रवाल यांच्या व्यतिरिक्त आणखी कुणी फोन केले होते? रक्कम किती ठरली होती? हातात किती रक्कम मिळाली होती? याची माहिती पोलीस घेत आहेत.**



### अल्पवयीन मुलांच्या मित्रांचाही जबाब नोंदवला

दरम्यान ज्या रात्री कल्याणीनगरमध्ये हा अपघात घडला तेव्हा अल्पवयीन मुलासोबत त्याचे दोन मित्रही होते. त्यांचा काल (मंगळवार) संध्याकाळी पोलिसांकडून जबाब नोंदवण्यात आला. अपघाता वेळी कार मध्ये उपस्थित असणाऱ्या अल्पवयीन मित्रांचा पुणे पोलिसांनी सविस्तर जबाब नोंदवला. तब्बल २ तास त्यांचा जबाब नोंदवण्यात येत होता. पोलिसांनी त्या अल्पवयीन मुलाच्या मित्रांकडून त्या दिवशी घडलेल्या घटनेची संपूर्ण, सविस्तर हकीकत जाणून घेतली असून त्यांच्या जबाबातून अनेक महत्वपूर्ण खुलासे होण्याची शक्यता आहे.

पुण्यातील कल्याणीनगर येथील हिट अँड रन प्रकरणा दिवसेंदिवस तापू लागलं असून याप्रकरणी आता आणखी एक नवे अपडेट समोर आले आहे. या अपघाताला जबाबदार ठरलेल्या अल्पवयीन मुलाला वाचवण्यासाठी त्याचे ब्लड सॅंपल बदलण्यात आलं होतं, त्यामुळे एकच गदारोळ माजला. खुद्द पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनीपुणे पोर्श अपघात प्रकरणात सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. या अपघात प्रकरणात ब्लड सॅंपल बदलल्या प्रकरणी अखेर दोन डॉक्टर आणि एका वॉर्डबॉयला घरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. तिघांनाही निलंबित करण्यात आले आहे. हा धक्कादायक खुलासा केला होता. आता या प्रकरणातील तिनही आरोपींचे निलंबन झाल्याचे खुद्द ससूनचे डीन डॉ. विनायक काळे यांनी जाहीर केलं. डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हळनोर आणि अतुल घटकांबळे या तिघांवरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अल्पवयनी आरोपीच्या ब्लड रिपोर्टमध्ये फेरफार झाल्याचे समोर आल्यानंतर काल याप्रकरणी चौकशी समितीने कडून तपास करण्यात आला होता. त्यानंतर आज हा निर्णय जाहीर केला.

### ससूनचे डीन काय म्हणाले ?

डॉ. अजय तावरे यांच्याकडे असणार कार्यभार आम्ही काढून घेतला आहे. तर डॉ. श्रीहरी हळनोर यांना बडतर्फ केले आहे. ससून रुग्णालयासाठी ही बाब अत्यंत वाईट आहे. अशा पद्धतीने ब्लड रिपोर्टमध्ये फेरफार करणे चुकीचे आहे. यासंदर्भात पोलिसांनी जी माहिती मागितली आहे ती त्यांना देण्यात आली आहे. माझ्याकडूनही विभागीय आयुक्त आणि आमच्या वरिष्ठांनी माहिती मागितली आहे, असे ससूनचे डीन डॉ. विनायक काळे यांनी नमूद केले. दरम्यान पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेची पथकं ससून रुग्णालयात दाखल झाली आहेत. या अपघातातील अल्पवयीन आरोपीच्या रक्ताचे नमुने कोणी बदलले, तसेच रक्ताचे नमुने कोणाचे घेतले गेले, पैसे घेऊन ससून मध्ये कोणी कोणाला दिले या सर्व गोष्टींची चौकशी करण्यासाठी घटकांबळे याला ससून मध्ये आणण्यात आले आहे.

# अभियंत्याची 82 लाखांची फसवणूक!

## सांगवीतील प्रकार; बारापेक्षा अधिक जणांविरुद्ध गुन्हा दाखल

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अभियंता म्हणून कार्यरत. लाखो रुपये महिना पगाराची नोकरी पण, गुंतवणुकीवर ३०० ते एक हजार टक्के परताव्याच्या आमिषाला भुलले आणि तब्बल ८२ लाख ५९ हजार रुपये गुंतवले. महिना होऊनही मूळ रक्कम वा परतावा न मिळाल्याने त्याने पोलिसांकडे धाव घेतली आणि आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला.**



> “व्हॉट्सॲप, फेसबुकवर येणाऱ्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये. मोबाईल किंवा इंटरनेट वापरताना नेहमी सतर्क राहायला हवे. अज्ञात लिंकवर क्लिक करू नये. बँक खात्याचा तपशील कोणालाही शेअर करू नये. अनेकदा दिशाभूल करून, मोठ्या परताव्याचे आमिष दाखवले जाते. त्याला बळी पडू नये.
>
> – **महेश बनसोडे,** वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सांगवी

नवी सांगवीतील चाळीस वर्षीय अभियंत्याने सांगवी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मॉर्गन स्टॅन्ले कंपनीचे आर्थिक सल्लागार डॉ. ध्रुव पारेख (संपूर्ण नाव व पत्ता माहिती नाही), कंपनीचे ग्लोबल लीडर लिंडा (पूर्ण नाव माहिती नाही, रा. वन वर्ल्ड सेंटर, मुंबई), मॉर्गन स्टॅन्ले ग्लोबल लीडर व्हॉट्सॲप ग्रुपची ॲडमिन, या ग्रुपचे अन्य सदस्य, सहा व्हॉट्सॲप क्रमांकधारक, वेगवेगळ्या चार ऑनलाइन लिंकधारक व ते तयार करणारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे. १८ एप्रिल ते २८ मे या कालावधीत हा प्रकार घडला. आर्थिक फसवणूक व माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

### अशी घडली घटना

डॉ. पारेख व त्याच्या साथीदारांनी मॉर्गन स्टॅन्ले कंपनीचे आर्थिक सल्लागार असल्याचे नवी सांगवीतील अभियंत्यास सांगितले. त्यांना कंपनीची लिंक पाठवली. कंपनीचे ट्रेडिंग खाते क्रमांक ८९७६०१९५८४ उघडण्यास सांगितले. शिवाय, गुंतवणूक करण्यास योग्य परिस्थिती निर्माण करून गुंतवणुकीवर ३०० ते १००० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास भाग पाडले. दरम्यानच्या कालावधीत वेगवेगळ्या लिंक व्हॉट्सॲपवर पाठवून ओट्स (एओटीएस) ॲप डाउनलोड करण्यास सांगितली. त्यावर शेअर्स मार्केटमधील वेगवेगळे शेअर्सची माहिती उपलब्ध करून दिली व ते खरेदी-विक्री करता येतात, असे भासवले. त्यानंतर कंपनीचे व वेगवेगळ्या बँकांचे खाते क्रमांक देऊन शेअर्स खरेदीसाठी पैसे पाठविण्यास सांगितले. त्यानुसार ८२ लाख ५९ हजार रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडले. त्या रकमेसह परतावा न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अभियंत्याने पोलिसांकडे धाव घेतली.

### संशयित क्रमांक व लिंक

नवी सांगवीतील अभियंत्याची फसवणूक करणारे काही मोबाईल क्रमांक व लिंक पोलिसांनी जाहीर केले आहेत. त्यात व्हॉट्सॲप क्रमांक ७३४७६६७९२७, ७३४७०८३६३२, ७३४०९३९०४५, ७०८७५७०७६०, ८१२१७३२२८५, ९०४१४६४५८० आणि www.aotstrade.com, https://h5.aotstrade21.com/#/pages/login, Ehttps://go.crisp.chat/chat/embed/?website_id=d7c7f53e-90ed-4f62-a8a8-aca03a9f3f5e/index, https://k9d5le.funilyfast.xyz/, https://llhbz.ihpsfctw.com/api/c/wsdrersf”Ehttps://tagik.bcbtwwbb.com/api/c/pojslakh या लिंकचा समावेश आहे.

### महावितरण अभियंत्यावर निलंबनाची कारवाई

माहिती अधिकारात उघड झालेल्या भ्रष्टाचारप्रकरणाची महावितरणने अखेर दखल घेतली असून, तळवडे शाखा अभियंत्यावर निलंबनाची कारवाई केली. रमाकांत गर्जे असे निलंबित केलेल्या अभियंत्याचे नाव आहे. पिंपरी चिंचवड इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे सचिव नितीन बोंडे यांनी माहिती अधिकार कायद्यातून हा भ्रष्टाचार उजेडात आणला होता.महावितरणच्या भोसरी विभागीय कार्यालयाकडून तळवडे येथील एका इमारतीच्या ४० घरगुती व व्यापारी वीज जोडणीसाठी १२७ किलोवॅट वीजभार मंजूर करण्यात आला होता. त्यासाठी महावितरणच्या एनएससी योजनेंतर्गत १०० केव्हीए ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढवून त्याठिकाणी २०० केव्हीए ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले. परंतु, ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढविण्याचे काम झाले नसतानाही तळवडे शाखा अभियंता गर्जे यांनी ४० पैकी २२ वीज जोडण्यांना वीज मीटर बसविले. या सगळ्या प्रकरणात मोठा भ्रष्टाचार झाला असून, अधिकाराचा गैरवापर करणे, महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान, संगनमताने वीज कंपनीच्या हितांना बाधा पोहोचविणे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नागरिकांचा आणि ग्राहकांचा जीव धोक्यात घालून वीज जोडण्या दिल्या जाणे, हे गंभीर गुन्हे शाखा अभियंता गर्जे यांनी केले. त्यामुळे त्यांना सेवेतून बडतर्फ करावे आणि त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी बोंडे यांनी केली होती. माहिती अधिकारात उघड झालेल्या माहितीनुसार, सर्व्हिस कनेक्शन चार्जेस, अनामत रक्कम आणि ग्राहकांचा मंजूर लोड यात तफावत असल्याचे तसेच ४० जोडण्याच्या घेतलेल्या शुल्कात आणि प्रत्यक्ष घ्यावयाच्या रकमेत सुमारे पाच लाख रुपयांचा अपहार तळवडे शाखा अभियंता यांनी केल्याचे स्पष्ट झाले होते. अखेर महावितरणने तळवडे शाखा अभियंता रमाकांत गर्जे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

---

# मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण उत्साहात

## मावळ लोकसभा मतदारसंघात 4 जून रोजी होणार मतमोजणी प्रक्रिया

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मतमोजणी हा निवडणूक प्रक्रियेतील अंतिम टप्पा आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात ४ जून रोजी होणारी मतमोजणी प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या नियमांचे आणि मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करुन पारदर्शक आणि शिस्तबद्ध, शांततापूर्ण वातावरणात तसेच विहीत वेळेत पार पाडण्यासाठी सर्व नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, असे निर्देश मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिले.**



चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहयेथे भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मावळ लोकसभा मतदारसंघातंर्गत मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे पहिले मतमोजणी प्रशिक्षण सत्र आज पार पडले. या प्रशिक्षण सत्रात मार्गदर्शन करताना मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला बोलत होते. यावेळी पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड आणि पिंपरी विधानसभानिहाय नियुक्त करण्यात आलेले सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके, अजित नैराळे, जनार्दन कासार, सुरेंद्र नवले, विठ्ठल जोशी, अर्चना यादव, मावळ लोकसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचे समन्वय अधिकारी प्रवीण ठाकरे, हिम्मत खराडे, निवडणूक समन्वयक अभिजीत जगताप, निवडणूक सहाय्यक सचिन मस्के, मनिषा तेलभाते, मनुष्यबळ कक्ष समन्वयक राजू ठाणगे, ईव्हीएम कक्ष समन्वय अधिकारी बापूसाहेब गायकवाड, क्षेत्रीय समन्वय अधिकारी अजिंक्य येळे, कर्मचारी व्यवस्थापन समन्वय अधिकारी किरणकुमार मोरे, प्रशिक्षण व्यवस्थापन समन्वय अधिकारी शिरीष पोरेडी, मास्टर ट्रेनर गोरखनाथ घोलप, संजय खोमणे, शशिकांत ऐवळे तसेच पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड, पिंपरी विधानसभा मतदारसंघातील मतमोजणीसाठी नियुक्त केलेले अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. ४ जून २०२४ रोजी बालेवाडी पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये मावळ लोकसभा निवडणुकीची मतमोजणी पार पडणार आहे. येथे सुरक्षा कक्ष (स्ट्रॉंग रूम) तयार करून या निवडणूक मतदानासाठी वापरलेली ईव्हीएम यंत्रे व टपाली मतपेट्या ठेवण्यात आल्या आहेत. याठिकाणी कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली असून मतमोजणीच्या दिवशी या सुरक्षा कक्षाचे सील निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच मावळ लोकसभा निवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येणार आहे. सकाळी ८ वाजेपासून प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

### 1 हजार 530 अधिकारी कर्मचारी नियुक्त

निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्या अधिपत्याखाली मतमोजणीसाठी विधानसभा मतदारसंघनिहाय एकूण १ हजार ५३० अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, इतर अधिकारी, सुक्ष्म निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक, तालिका कर्मचारी, शिपाई, हमाल, इतर कर्मचारी वर्ग नेमण्यात आला आहे. नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे आवश्यक मतमोजणी प्रशिक्षण पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली.



## भूमिका

**जगभरातील अनेक देशांत राजकीय कारणांमुळे हिंसाचार वाढत असल्याचे दिसते. मध्य युरोपातील स्लोवाकिआ या छोटेखानी देशाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यावर झालेला हल्ला, हे या वाढत्या हिंसाचाराचे ताजे उदाहरण आहे.**

# राजकीय हिंसाचाराचे सावट

राजकीय हिंसाचाराचे सर्वसाधारणतः दोन मुख्य सिद्धांत मानले जातात. एक असतो 'मॅक्रो' सिद्धांत; तर दुसरा 'मायक्रो' सिद्धांत. या दोन सिद्धांतांमधील 'मॅक्रो' सिद्धांतांर्गत आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रश्नांमुळे राजकीय हिंसाचार निर्माण होण्याची कारणमीमांसा केली जाते; तर 'मायक्रो' सिद्धांतानुसार एखादी व्यक्ती आणि कुटुंब यांच्याकरवी केल्या जाणाऱ्या राजकीय हिंसाचाराबाबत चर्चा केली जाते. पैकी राजकीय कारणांमुळे हिंसाचार जगभरात वाढत असल्याचे दिसत आहे. मध्य युरोपातील स्लोवाकिआ या छोटेखानी देशाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यावर झालेला हल्ला, हे या वाढत्या हिंसाचाराचे ताजे उदाहरण आहे. हा देश आपल्यापासून कितीही दूर असला तरी, भारतातील राजकीय संस्कृती ज्या वेगाने बदलत आहे ते पाहता, भारत अशा घटनांपासून फार दूर नाही, ही बाब आपण लक्षात ठेवायला हवी.



सुमारे १५ दिवसांपूर्वी, १५ मे रोजी झालेल्या भीषण हल्ल्यात रॉबर्ट फिको हे जबर जखमी झाले. आता त्यांची प्रकृती सुधारत असल्याच्या बातम्या आहेत. फिको हे लोकांशी हस्तांदोलन करत असताना त्या लोकांमध्येच उभ्या असलेल्या एका एकाहत्तर वर्षीय व्यक्तीने अगदी जवळून फिको यांच्यावर पाच गोळ्या झाडल्या. त्या पाचही गोळ्या फिको यांच्या हातात आणि पोटात घुसल्या आणि त्यांना हेलिकॉप्टरने राजधानीचे शहर असलेल्या ब्रातिसलावा येथे उपचारार्थ आणावे लागले. अतिशय सामान्य अशा या युरोपीय देशाची मागील काही वर्षांची वाटचाल अतिशय बिकट आणि फुटीरतावादी अशा राजकीय अस्थिरतेतून सुरू आहे, ही विदारक वस्तुस्थिती आहे. मध्य युरोपातील एक तुलनेने नवा देश म्हणून स्लोवाकिआ आज जगाला ठाऊक आहे. मूळच्या चेकोस्लोवाकिआ या देशाचे दोन तुकडे झाले ते १ जानेवारी, १९९३ रोजी; आणि चेक प्रजासत्ताक व स्लोवाकिआ प्रजासत्ताक अशा दोन स्वतंत्र देशांची निर्मिती त्यातून झाली. पूर्व दिशेला युक्रेन, पश्चिमेला चेक प्रजासत्ताक, दक्षिणेला हंगेरी आणि उत्तरेला पोलंड अशा एकेकाळच्या कम्युनिस्ट राजवटी असलेल्या देशांचे शेजार स्लोवाकिआ या देशाला लाभलेले आहे. अगदी स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच तेथील बऱ्याच नागरिकांनी त्यांना चेक प्रजासत्ताकाचे नागरिकत्व मिळावे, म्हणून अर्ज करण्यास सुरुवात केली. आकाराने, ताकदीने जरी हा देश छोटा असला, तरी कडवेपणात, राष्ट्रवादात हा देश नेहमीच अग्रेसर राहिला आहे. आणि त्याची परिणीती अनेकदा अस्थैर्य आणि सामाजिक, राजकीय उलथापालथीत झालेली दिसते. स्लोवाकिआमधील राजकीय पक्षांनी त्यांचा स्वतंत्र देश होण्याआधीच साधारण चार महिने देशाचे संविधान मंजूर केले होते. त्या नंतर स्लोवाकिआचे समाजकारण आणि राजकारण हे सातत्याने दुही पसरविणारे राहिले आहे, हे एकंदर घटनांचा आढावा घेता दिसून आले आहे.

रॉबर्ट फिको हे गेल्या चोवीस वर्षांच्या कालावधीत दहा वर्षे स्लोवाकिआच्या पंतप्रधानपदी राहिले आहेत. त्यांना तब्बल चार वेळा पंतप्रधानपदाची संधी मिळालेली आहे. दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धात 'नाटो' संघटनेचा एक सदस्य म्हणून युक्रेनची मदत करणारा स्लोवाकिआ आता मात्र पूर्णतः युक्रेनच्या विरुद्ध भूमिका घेताना दिसतो आहे. देशभर पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्याविरुद्ध याआधीही अनेकदा जनक्षोभ उसळलेला आहे. सर्वप्रथम सन २०१६मध्ये भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे हेच फिको आणि त्यांचे तत्कालीन काही मंत्री यांनी राजीनामे द्यावेत, या मागणीसाठी देशभर मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली; मात्र त्या निदर्शनांतून लोकांच्या हाती काही मिळाले नाही. त्यानंतर, २५ फेब्रुवारी, २०१८ रोजी स्लोवाक पत्रकार जान कुसिआक आणि त्यांची मैत्रीण मार्टिना ह्या दोघांचे मृतदेह कुसिआक यांच्या घरात सापडले. या प्रकारानंतर देशभर अतिशय तीव्र अशी निदर्शने झाली. जनक्षोभ प्रचंड वाढल्यावर, तीव्र झाल्यानंतर फिको यांना राजीनामा देऊन पंतप्रधानपदावरून पायउतार व्हावे लागले होते. मात्र सप्टेंबर, २०२३मध्ये घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पुन्हा एकवार रॉबर्ट फिको यांच्या स्मेअर पार्टीला बहुमत मिळाले; आणि चौथ्यांदा पंतप्रधान व्हायची त्यांना संधी मिळाली.

## प्रासंगिक »

# 'ससून' मधील कीड

***आपली शहरे थोड्याफार फरकाने बकालच; पण ती निदान डोंबिवली वा पुण्याप्रमाणे सांस्कृतिक राजधानी, 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' वगैरे तोरा तरी मिरवत नाहीत...***

राजकीय हस्तक्षेपाद्वारे पदे मिळवून भ्रष्टाचार करण्याचा मार्ग प्रशस्त झाल्याचे 'ससून'मधील या घटनांवरून दिसते. गेल्या काही वर्षांपासून 'ससून'मधील राजकीय हस्तक्षेप वाढत आहे. हा हस्तक्षेप रुग्णांना उपचार मिळण्यासाठी नसून, शवविच्छेदनापासून कैद्यांच्या बडदास्तीपर्यंत अनेक कामांसाठीचा दिसतो. केवळ पुण्यातीलच नव्हे, तर पश्चिम महाराष्ट्रातील सर्वांत मोठे सरकारी रुग्णालय अशी ख्याती असलेल्या ससून रुग्णालयातील गैरव्यवहारांची आणि गुन्हेगारीची सध्या बाहेर येत असलेली प्रकरणे वैद्यकीय गुन्हेगारीवरील कथा-कादंबऱ्यांतील आणि चित्रपटांतील कथानकांपेक्षाही धक्कादायक आहेत. अपुऱ्या पायाभूत सुविधा, औषधांचा तुटवडा, तज्ज्ञ डॉक्टरांची वानवा आदी अनेक कारणांमुळे आपल्याकडील खुद्द सार्वजनिक आरोग्य यंत्रणेची अवस्था गंभीर रुग्णासारखी झाली आहे. हा आजार बरा होण्याची चिन्हे नसतानाच भ्रष्टाचाराच्या आणि गुन्हेगारीच्या किडीने या यंत्रणेला पोखरल्याचे समोर येत आहे.

परदेशात पाठवलेले काही भारतीय मसाले, त्यांमध्ये इथिलीन ऑक्साइडचे प्रमाण ठरलेल्या प्रमाणापेक्षा अधिक आढळल्यामुळे नाकारण्यात आले, ही बातमी बरीच गाजली. सोशल मीडिया खरे आणि खोटे यांची सरमिसळ करून बातम्या सर्वत्र पसरवण्याचे काम तत्परतेने करते.

# मसाल्यांच्या वादाची दुसरी बाजू

या मसाल्यांची गोष्टदेखील अशीच चटकदार झाली आहे. हे सर्व लेख आणि बातम्या वाचून सामान्य ग्राहक गोंधळून जातो. हे समज-गैरसमज कोणते आणि यामागील खरे विज्ञान काय, याबद्दल मात्र चर्चा होत नाहीत.

स्पाइस म्हणजे मसाले. याचा नेमका अर्थ काय? शेकडो वर्षे पाश्चिमात्य लोक मसाल्यांच्या पदार्थासाठी भारत आणि आजूबाजूची बेटांवर का येत होते? अन्नाला स्वादिष्ट बनवितो तो मसाला. अन्नाला चव आणि विशिष्ट सुगंध देण्यासाठी वनस्पतीची पाने, फुले, फळे, बिया, साले वापरण्याची परंपरा हजारो वर्षे आपल्या देशात आहे. यांमधील अनेक मसाल्याच्या पदार्थांमध्ये अन्न टिकवण्याचा गुणधर्म आहे. परदेशात लोणचे म्हणजे व्हिनेगार वापरून टिकवलेली भाजी; पण आपले लोणचे म्हणजे भरपूर मसाला, मीठ आणि तेल यांच्या सहाय्याने वर्षभर, उन्हाळ्यात सुद्धा टिकणारा पदार्थ. धने, जिरे, मिरे, लवंगा, वेलदोडा या बिया आहेत, तर दालचिनी हे खोडाचे साल आणि त्याच झाडाची



पाने म्हणजे तमाल पत्र. कोथिंबीरपाने ताजी खातात आणि त्याच्या बिया धने. दगडफूल हे एक प्रकारचे शैवाल आणि कवक आहे. केशर हे नावाप्रमाणेच फुलातील केसर आहेत आणि त्याचा स्वाद हा अन्नपदार्थाला सुगंध आणि शिवाय सुरेख केशरी रंग देणारा आहे.

आता प्रश्न असा पडतो की, ज्या मसाल्यांच्या मदतीने लोणचे टिकते, ते मसाले खराब कसे आणि का होतात? उत्तर सोपे आहे. पूर्वी सर्व धान्ये आणि वर्षाचे मसाले साठवून ठेवत असत. जंतूच्या वाढीसाठी, तसेच रासायनिक बदलांसाठी पाणी लागते, म्हणून उन्हात वाळविणे, तेलावर भाजणे, मीठ घालणे, डब्यात भरल्यावर हवेचा संपर्क टाळणे हे घरगुती उपाय होत. अशा प्रकारे बुरशी टाळता येते. काही किलो वस्तू हाताळताना हे उपाय पुरेसे आहेत, पण हजारो किलो, टनावारी मसाल्यांचे पदार्थ कारखान्यांत येतात ते विविध शेतांतून, विविध राज्यांतील जंगले, बागा यातून. अगदी छोट्या प्रमाणात जरी माल खराब झाला तर सर्वच माल पुढे बाजारात गेल्यावर खराब होण्याचा धोका असतो. तसेच काही वेळा माती अथवा कामगारांच्या अस्वच्छ हाताळण्यामुळे ई-कोलाय सारखे जंतू शिरकाव करतात. त्यामुळे कोणता मसाला आहे, अख्खा आहे की पावडर, याचा विचार करून विविध पद्धतीने मसाले सहा महिने ते एक वर्ष टिकवले जातात. कित्येक दशकांच्या संशोधनानंतर 'बीएआरसी'च्या शास्त्रज्ञांनी गामा रेडिएशनच्या मदतीने जिरे, धने अशा पदार्थांमध्ये पोरकिडे होऊ नये, यासाठी सुरक्षित पद्धत विकसित केली आणि आपल्या अन्नसुरक्षा कायद्याने ती मान्य केली आहे. ही पद्धत वापरली असल्यास त्या लेबलवर विशिष्ट खूण करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तीन दिवसांत माफी मागा!

## एकनाथ शिंदे : अन्यथा कारवाईला सामोरे जा, संजय राऊत यांना नोटीस

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान प्रत्येक मतदारसंघात २५ ते ३० कोटी रुपये वाटले. त्याचवेळी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचा एकही उमेदवार निवडून येऊ नये, यासाठी एकनाथ शिंदे यांनी कारस्थाने केली', असे गंभीर आरोप शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी केला होता. शिवसेनेचे मुखपत्र 'रोखठोक' या सदराखाली त्यांनी लेख लिहून मुख्यमंत्र्यांवर गंभीर आरोप केले होते. याचप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे.**



केलेल्या आरोपांचे पुरावे द्या, नाहीतर कायदेशीर कारवाईला सामोरे जा, असा इशाराच मुख्यमंत्र्यांनी नोटिसीद्वारे राऊत यांना दिलाय.

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा धुरळा खाली बसल्यावर संजय राऊत यांनी २६ मे रोजी लोकसभा निवडणुकी दरम्यानच्या राजकारणावर भाष्य करणारा लेख लिहिला. या लेखातून त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना लक्ष्य करताना निवडणूक काळात सत्ताधाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर पैशांचा वापर करण्यात आल्याचा आरोप केला. गैरसंविधानिक बेकायदा मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक लोकसभा मतदारसंघात २५ ते ३० कोटी रुपये वाटल्याचा आरोप करून अजितदादांना एकही जागा मिळू नये म्हणून मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न केल्याचा आरोप करून राऊत यांनी खळबळ उडवून दिली. याच आरोपांवरून मुख्यमंत्र्यांनी संजय राऊत यांना नोटीस पाठवली आहे.

वकील चिराग शाह यांच्याद्वारे एकनाथ शिंदे यांनी राऊत यांना नोटीस पाठवली आहे. या ते म्हणतात, माझे अशील राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राजकारण आणि समाजकारणात सक्रीय असून जनमाणसांत त्यांचे स्थान मोठे आहे. संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांतून त्यांच्या प्रतिमेला धक्का लावण्याचा प्रयत्न झाला. सामना वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक म्हणून त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहेच, परंतु त्यांनी अधिकारांचे उल्लंघन केले असून म्हणूनच त्यांनी झालेल्या चुकीबद्दल माफी मागावी अन्यथा त्यांच्याविरोधात अब्रूनुकसानीचा दावा दाखल करण्यात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

### एकनाथ शिंदे यांनी नोटिसीमध्ये काय म्हटलंय?

संजय राऊत यांचे हे आरोप दिशाभूल करणारे असून जनमाणसात माझी प्रतिमा मलिन करणारे आहेत. यातून त्यांना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला फायदा मिळवून द्यायचा आहे, असे सांगत माझ्यावरील आरोपाचे ३ पुरावे द्या नाहीतर कायदेशीर कारवाईला सामोरे जा, असे एकनाथ शिंदे यांनी नोटिसीतून म्हटले आहे.

### संजय राऊत यांनी काय म्हटलंय?

५० खोके एकदम ओके... इसे कहते है उलटा चोर कोतवाल को डाटे... गैरसंविधानिक मुख्यमंत्री श्रीमान शिंदे ने हमे एक लिगल नोटीस भेजी है. very intresting and one of the funny political document. अब आयेगा मजा! जय महाराष्ट्र.....

---

# पर्यटकांना गुड न्यूज! आता दीड तासात गाठा अलिबाग!

## 126 किलोमीटर लांबीच्या कॉरिडोरचे काम वेगाने सुरू, काम दोन टप्प्यात होणार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बहुचर्चित असलेला विरार अलिबाग प्रकल्प पुन्हा आता वेगाने सुरु झालाय, २०१६ साली सुरु झालेला प्रकल्प साधारण १२६ किलोमीटर लांबीचा आहे. या कॉरिडॉरमुळे विरार आणि पनवेल अलिबाग अंतर कमी होणार, थोडक्यात विरार ते अलिबाग दीड तास तर पनवेल ते अलिबाग अर्ध्या तासात गाठता येईल. भूसंपादन रखडल्याने हा प्रकल्प बराच वेळ कागदावरच होता पण अखेर आता एमएसआरडीसीने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्वरित पावले उचलत प्रकल्प मार्गी लावलाय.**



भूसंपादनाचे काम रखडल्यामुळे प्रकल्प गेला MSRDC मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग प्रकल्पासाठी खूप कमी वेळात एमएसआरडीसीकडे भूसंपादनाचे काम पूर्ण केले होते.त्यामुळंच सरकारने १२६ किमी लांबीच्या महामार्गाचे काम एमएसआरडीसीकडे सोपवले आहे. साधारण १२६ किमी लांबीचा महामार्गाच्या कॉरिडॉरचे काम दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यात ९८ किलोमीटर आणि दुसऱ्या टप्प्यात २८ किलोमीटर लांबीचा मार्ग बनवण्यात येणार आहे. कॉरिडॉर पालघर,ठाणे आणि रायगड जिल्ह्यातून जाणार आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी भूसंपादनाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठी भूसंपादनाचे काम सुरू आहे.वडघर ते पनवेल हा ९.१२ किमी लांबीचा रस्ता तयार करण्यात येईल त्यात १.८ किमी लांबीच्या बोगद्याचाही समावेश असेल. प्रकल्पाचा प्रस्तावित खर्चाचा अंदाज

पहिल्या टप्प्याच्या बांधकामासाठी सुमारे १८,४३१.१५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.या प्रकल्पासाठी १४ कंपन्यांनी निविदा दाखल केल्या होत्या.

या प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यात ११ पॅकेज तयार करण्यासाठी १४ कंपन्यांनी ३३ टेंडर भरलेत. मात्र,त्यातील ७ कंपन्यांचे टेंडर पास करण्यात आले आहे.

### वाहतूक समस्या सुटणार

एमएमआरमध्ये वाहतूक कोंडीची समस्या मोठी आहे, अशा स्थितीत हा मार्ग तयार झाल्यानंतर वाहतुकीची समस्या कमी होऊन नागरिकांचा प्रवास जलदगतीने पूर्ण करता येणार आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्ग, मुंबई-नाशिक महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग,मुंबई-गोवा महामार्ग, पनवेल-जेएनपीटी आणि अटल सेतू हे अलिबाग-विरार प्रकल्पाला जोडले जातील.या प्रकल्पामुळे विरार ते अलिबाग हा प्रवास अवघ्या दीड ते दोन तासांत पूर्ण करणे शक्य होणार आहे.सध्या विरारहून अलिबागला जाण्यासाठी ४ ते ५ तास लागतात, महामार्गामुळे पनवेलवरुन केवळ अर्धा तास अलिबाग गाठता येणार आहे.

# “कॉँग्रेसशी कायमचा घरोबा नाही”!

## केजरीवाल यांचं मोठं विधान; म्हणाले, “...त्यामुळेच हरियाणात विरोधात लढलो”!

।नवी दिल्ली ।वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल गेल्या काही दिवसांपासून जामिनावर बाहेर आहेत. २ जूनपर्यंत न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. त्यानंतर पुन्हा त्यांना तुरुंगात जावं लागेल. मात्र, यादरम्यान प्रचारसभा व मुलाखतींमधून त्यांनी केंद्रातील मोदी सरकारवर व भारतीय जनता पक्षावर परखड शब्दांत हल्लाबोल केला आहे. मात्र, दुसरीकडे आपनं इंडिया आघाडीत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. ज्या काँग्रेसला हरवून केजरीवाल दिल्लीत विजयी झाले, त्याच काँग्रेससोबत ते इंडिया आघाडीत दाखल झाले. मात्र, आता काँग्रेसशी घरोबा कायमचा नाही असं केजरीवाल यांनी स्पष्ट केलं आहे.**



आम आदमी पक्षानं दिल्लीत आणि नंतर पंजाबमध्येही काँग्रेसचा पराभव करून सत्ता हस्तगत केली. मात्र, यंदाच्या लोकसभा निवडणुकीआधी स्थापन झालेल्या विरोधकांच्या इंडिया आघाडीत आम आदमी पक्ष सहभागी झाला. त्यामुळे त्यांच्यावर काँग्रेसशी सलोखा केल्याची टीका होऊ लागली. मात्र, तरीही केजरीवाल यांनी मोदींचा पराभव करण्यासाठी इंडिया आघाडीत सहभागी होण्याच्या निर्णयावर ठाम असल्याचं जाहीर केलं. दिल्लीमध्ये आप आणि काँग्रेसनं निम्म्या-निम्म्या जागा वाटून घेतल्या. पण आता केजरीवाल यांनी केलेल्या एका विधानाची चर्चा होऊ लागली आहे.

### काय म्हणाले अरविंद केजरीवाल?

अरविंद केजरीवाल यांनी इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीमध्ये सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य केलं. आप आणि काँग्रेसची कायमस्वरूपी आघाडी नाही, असं केजरीवाल म्हणाले आहेत. “आपचा काँग्रेसशी कायमस्वरूपी घरोबा नाही. आमचं ध्येय हे भाजपाचा आत्ता पराभव करून हुकुमशाही व गुंडगिरीच्या राजकारणाला पायबंद घालणं हे आहे”, असं केजरीवाल म्हणाले. “सध्या देशाला वाचवणं महत्त्वाचं आहे. जिथे कुठे भारतीय जनता पक्षाला पराभूत करण्यासाठी आघाडी आवश्यक होती, तिथे आम आदमी पार्टी आणि काँग्रेस एकत्र आली आणि दोघांचा मिळून एक उमेदवार उभा केला. पंजाबमध्ये भाजपाचं अस्तित्वच नाहीये. म्हणून पंजाबमध्ये आम्ही स्वतंत्र लढलो”, असंही अरविंद केजरीवाल यांनी नमूद केलं.

### स्वाती मालीवालप्रकरण न्यायालयात सुरु आहे

तथापि, केजरीवाल यांनी आपच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांच्यावरील कथित मारहाण प्रकरणावर भाष्य करण्यास नकार दिला. ते म्हणाले, हे प्रकरण न्यायालयात आहे. केजरीवाल म्हणाले, एक बाजू त्यांची आणि दुसरी बाजू विभवची. न्यायालयाने विचार करून न्याय द्यावा, असे मला वाटते. आजवर विभवहर फक्त आरोप होत आहेत. हे आरोप सिद्ध झालेले नाहीत. तसेच विभव जे बोलला त्याचीही एक बाजू आहे. दोन्ही बाजू आहेत. न्यायाधीशांना न्याय देऊ द्या.

### “योगी आदित्यनाथ यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह”

दरम्यान, अरविंद केजरीवाल यांनी योगी आदित्यनाथ यांच्याबाबतच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. “मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे. जर पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा सत्तारूढ झाले, तर योगी आदित्यनाथ यांच्या भवितव्यावर मोठं प्रश्नचिन्ह उभं राहील. भारतीय जनता पक्षानं या भूमिकेचा इन्कार करून दाखवावा”, असं आव्हानच योगी आदित्यनाथ यांनी दिलं आहे.

### मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार नाही

आपण घाबरणार नाही आणि दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे केजरीवाल यांनी सांगितले. दिल्ली दारू धोरण प्रकरणात अटक झाल्याबद्दल केजरीवाल म्हणाले की, पुन्हा तुरुंगात जाणे माझ्यासाठी वावगे नाही. या देशाचे भवितव्य पणाला लागले आहे. त्यांना वाटेल तेव्हा ते मला तुरुंगात टाकू शकतात, मी घाबरणार नाही. भाजपला हेच हवे आहे, त्यामुळे दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नाही.

# “मोदींचे मंदिर बांधू आणि ढोकळा अर्पण करू”

## पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उडवली खिल्ली

।नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मला देवानेच पाठवलं आहे, असे विधान पंतप्रधान मोदींनी १४ मे रोजी केले होते. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान मोदींच्या या विधानाची चांगलीच खिल्ली उडवली आहे. “माझा जन्म जैविकदृष्ट्या झाला नसून. देवानेच मला त्याचे कार्य करण्यासाठी पाठवलं आहे. माझ्या शरीरातील ऊर्जा मानवी ऊर्जा नसून ती दैवी ऊर्जा आहे. त्याचे कार्य मी करत आहे”, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी येथे दि. १४ मे रोजी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान केले होते. या विधानाची पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी खिल्ली उडवली आहे. “मोदी जर देव असतील तर त्यांनी राजकारण करू नये आणि दंगली घडवू नयेत”, असा खोचक टोला त्यांनी लगावला.**



कोलकाता येथे एका जाहीर सभेला संबोधित करत असताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, ठजो व्यक्ती स्वतःला देव समजतो त्याने राजकारण करू नये. देव कधीही दंगली भडकवत नाही. आम्ही तुमचे मंदिर बांधू. तुम्हाला प्रसाद चढवू. फुलं वाहू आणि जर देवाची इच्छा असेल तर आम्ही ढोकळाही अर्पण करू.” १४ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरला. यावेळी त्यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देत असताना सदर विधान केले होते. त्यानंतर काँग्रेस आणि विरोधकांकडून या विधानावर टीका करण्यात आली. तसेच भाजपाचे ओडिशामधील पुरी लोकसभेचे उमेदवार आणि प्रवक्ते संबित पात्रा यांनीही मध्यंतरी केलेले एक विधान वादाचे केंद्र ठरले होते. पुरी मंदिरातील भगवान जगन्नाथ हेदेखील मोदींचे भक्त आहेत, असे पात्रा म्हणाले होते. या विधानानंतर पात्रा यांनी दिलगिरीही व्यक्त केली. चुकून हे विधान तोंडून गेले, असे ते म्हणाले. मात्र लागोपाठ झालेल्या या विधानामुळे विरोधकांना आयता मुद्दा मिळाला. ममता बॅनर्जी पुढे म्हणाल्या की, मी आतापर्यंत अनेक पंतप्रधानांबरोबर काम केलं. जसे की, अटल बिहार वाजपेयी ज्यांनी मला माया लावली. डॉ. मनमोहन सिंग, राजीव गांधी, नरसिंह राव, देवेगौडा यांच्याही बरोबर काम करण्याची संधी मिळाली. पण असा (मोदींसारखा) पंतप्रधान मी कधीही पाहिला नाही. असे पंतप्रधान देशाला नको आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही पंतप्रधान मोदींच्या विधानावर टीका केली होती. मंगळवारी एका जाहीर सभेत बोलत असताना ते म्हणाले की, परमात्म्याने गौतम अदाणी, मुकेश अंबानी अशा धनदांडग्यांची मदत करण्यासाठी नरेंद्र मोदींना पाठवले आहे. ते गरीबांची सेवा करत नाहीत. तसेच शेतकरी आणि मजूरांची सेवा करण्यासाठी मोदींना देवाने पाठवले नाही का? असाही खोचक सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला.

### राहुल गांधींचा पंतप्रधान मोदींना टोला!

महात्मा गांधी यांच्यावर जेव्हा पहिला चित्रपट बनला, तेव्हा जगभरात गांधींबाबत कुतूहल निर्माण झालं. त्यापूर्वी त्यांना कोणीही ओळखत नव्हतं, असं विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी एका मुलाखतीत बोलताना केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही या विधानावरून पंतप्रधान मोदींना टोला लगावला आहे. राहुल गांधी यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत मोदींच्या या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. “महात्मा गांधींबद्दल जाणून घेण्यासाठी केवळ एंटायर पॉलिटिकल सायन्सच्या विद्यार्थ्यांलाच चित्रपट बघावे लागतील”, असा टोला त्यांनी लगावला.



# तो माझ्या आयुष्यातून गेलाच नाही: जान्हवी कपूर

अभिनेत्री जान्हवी कपूर तिच्या खासगी आयुष्याबद्दल नेहमीच मोकळेपणे व्यक्त झाली. सध्या तिच्या आगामी 'मिस्टर अँड मिसेस माही' या चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त ती विविध मुलाखतीत देत आहे. यातील एका मुलाखतीत जान्हवीने तिचा हृदयभंगाचा अनुभव सांगितला. आयुष्यात असा अनुभव फक्त एकदाच घेतल्याचं तिने कबुल केलं. मात्र हृदयभंग हा केवळ रोमँटिकच असतोच असं नाही, हे तिने स्पष्ट केलं. जान्हवीने 2018 मध्ये बॉलिवूड पदार्पणाच्या काही महिने आधी आई श्रीदेवी यांना गमावलं होतं. आईचं निधन ही घटनासुद्धा एकाप्रकारे हृदयभंग झाल्यासारखंच होतं, असं जान्हवी म्हणाली.

रणवीर अलाहाबादियाच्या पॉडकास्टमध्ये जान्हवीने सांगितलं, "मला असं वाटत नाही की हृदयभंग हा केवळ रोमँटिक नात्यातच असू शकतो. तो इतर अनेक गोष्टींबद्दलही असू शकतो. जेव्हा तुम्हाला एखाद्या गोष्टीकडून खूप अपेक्षा असते आणि त्याच्याशी तुम्ही भावनिकदृष्ट्या जोडलेले असता, तेव्हासुद्धा तुमचा हृदयभंग होऊ शकतो. इतक्या अपेक्षा असताना गोष्टी मनासारख्या घडल्या नाही, तर तेव्हा जी मनस्थिती असते ती हृदयभंग झाल्यासारखीच असते. मी माझ्या करिअरमध्ये असा अनुभव घेतला. रोमँटिकदृष्ट्याही माझा हृदयभंग झाला आहे. पण माझ्या मते आईच्या निधनानंतर मी सर्वाधिक खचले होते." "रोमँटिक नात्याबद्दल विचारत असाल तर त्या हृदयभंगाच्या अनुभवातून मी बाहेर पडले. कारण ती व्यक्ती माझ्या आयुष्यातून कधी गेलीच नाही आणि त्यामुळे मला त्यातून बाहेर येण्यास मदत झाली.



# "मी शाहरुखच्या धर्माचा आदर करते: गौरी खान

बॉलीवूडचा किंग खान शाहरुखने त्याच्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात आपलं वेगळं स्थान निर्माण केलंय. शाहरुखचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. शाहरुखचे अनेक व्हिडीओ रोज सोशल मीडियावर व्हायरल होतात. आता त्याच्या पत्नीचा म्हणजेच गौरीचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय.२००५ रोजी 'कॉफी विथ करण'च्या पहिल्या सीझनमध्ये जेव्हा गौरीने हजेरी लावली होती, तेव्हा लग्नानंतर धर्मांतर करण्याच्या विचाराबाबत तिने आपलं मत व्यक्त केलं होतं. याचाच व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होतोय.

व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये गौरी म्हणाली होती, "आर्यन खान शाहरुखला फॉलो करतो. मला असं वाटतं की, तो नक्कीच शाहरुखचा धर्म पाळेल. तो नेहमीच असं म्हणेल की मी मुस्लीम आहे. आर्यन जेव्हा याबद्दल माझ्या आईला सांगतो, तेव्हा माझी आई त्याला विचारते की, "याचा अर्थ काय आहे."

गौरी पुढे म्हणाली होती, "मी शाहरुखच्या धर्माचा आदर करते, पण त्याचा अर्थ असा नाही की मी धर्मांतर करून मुस्लीम होईन, माझा त्यावर विश्वास नाही. मला वाटतं की, प्रत्येक जण एक स्वतंत्र व्यक्ती आहे आणि ते त्यांच्या धर्माचं पालन करतात. पण, सहाजिकच कोणत्याही धर्माचा अनादर होता कामा नये. शाहरुख माझ्या धर्माचाही कधी अनादर करत नाही आणि करणारही नाही." काही वर्षांपूर्वी जेव्हा शाहरुख 'डान्स प्लस ५'च्या सेटवर गेला होता तेव्हा तो म्हणाला होता, "आम्ही घरात कधी हिंदू-मुस्लीम अशी गोष्टच नाही केली. माझी पत्नी हिंदू आहे, मी मुसलमान आहे आणि माझी जी मुलं आहेत ती हिंदुस्थान आहेत. जेव्हा माझी मुलं शाळेत होती, तेव्हा फॉर्ममध्ये धर्म काय आहे हे भरायला लागायचं. जेव्हा माझी मुलगी लहान होती तेव्हा तिने मला येऊन एकदा विचारलं की, बाबा आपण कोणत्या धर्माचे आहेत.

# आम्ही जरांगे...' सिनेमात मकरंद देशपांडे साकारणार मनोज जरांगेंची भूमिका

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर सिनेमा येणार आहे. याआधी 'संघर्षयोद्धा- मनोज जरांगे पाटील' या सिनेमाची घोषणा झाली. मात्र निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या सिनेमाचं प्रदर्शन पुढे ढकलण्यात आलं. आता 'आम्ही जरांगे' या सिनेमाची घोषणा करण्यात आली आहे. हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'आम्ही जरांगे' या सिनेमात अभिनेते मकरंद देशपांडे हे मनोज जरांगे पाटील यांची भूमिका साकारणार आहेत. 'आम्ही जरांगे' गरजवंत मराठ्यांचा लढा' हा सिनेमा येत्या 14 जूनला सिनेमागृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## चित्रपट कधी प्रदर्शित होणार?

मराठा आरक्षणाच्या संघर्षगाथेची रुपेरी पडद्यावर जिवंत अनुभूती करून देणारा 'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' हा चित्रपट येत्या 14 जूनला प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. नारायणा प्रोडक्शन निर्मित आणि योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित 'आम्ही जरांगे- गरजवंत मराठ्यांचा लढा' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे सह निर्माते उत्तमराव नारायणराव मगर, डॉ. मधुसूदन उत्तमराव मगर, विक्रम विठ्ठलराव पाटील, दमयंती विठ्ठलराव पाटील, दादा दत्ता यशवंतराव मोरे, योगेश पांडुरंग भोसले हे आहेत.




## कोण- कोण कलाकार सिनेमात असणार?

मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या ज्वलंत चळवळीला मोठ्या पडद्यावर चित्रपटाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' या चित्रपटांमध्ये अभिनेते मकरंद देशपांडे, सुबोध भावे, प्रसाद ओक, अजय पुरकर, विजय निकम, कमलेश सावंत, भूषण पाटील, चिन्मय संत, अमृता धोंगडे, अंजली जोगळेकर, आरती त्रिमुखे, प्रेम नरसाळे ही गाजलेली सुप्रसिद्ध कलाकार मंडळी आहेत.

# 'ख्वाडा' फेम भाऊसाहेब शिंदेची नवी झेप; दिसणार 'या' हिंदी चित्रपटात



राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'ख्वाडा' हा सिनेमा प्रचंड गाजला. या सिनेमातील 'बाळू' या पात्राने अभिनेता भाऊसाहेब शिंदे याला महाराष्ट्रभरात ओळख दिली. या गाजलेल्या मराठी चित्रपटामध्ये नायक साकारत अवघ्या देशातील रसिकांचं लक्ष वेधून घेत सिनेसृष्टीत दाखल झालेला अभिनेता भाऊसाहेब शिंदे नेहमीच नवनवीन रूपात प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'बबन' या बहुचर्चित चित्रपटामध्ये डॅशिंग भूमिका भाऊसाहेब शिंदे याने गाजवली आता भाऊसाहेब शिंदे नव्या सिनेमात काम करणार आहे. हा सिनेमा मराठी आणि हिंदी भाषेत रिलीज होणार आहे. 'गोवर्धन' हा भाऊसाहेब शिंदेचा सिनेमा लवकरच प्रदर्शित होणार आहे.

भाऊसाहेबच्या 'रौंदळ' चित्रपटामधलं ॲक्शनरूप खऱ्या अर्थानं रसिकांना खिळवून ठेवणारं होतं. भाऊसाहेब आता पुन्हा एकदा ॲक्शन रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. भाऊसाहेबची मुख्य भूमिका असलेल्या 'गोवर्धन' या आगामी मराठी-हिंदी चित्रपटाची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे.

# टी-20 वर्ल्ड कपपूर्वी सर्वांनाच धक्का!

## श्रीलंकेला चक्क नेदरलँड्सने केले पराभूत

लॉडरहिल । वृत्तसंस्था



**टी-२० वर्ल्ड कपपूर्वीच आता सर्व चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. कारण वर्ल्ड कप सुरु होण्यापूर्वीच आता नेदरलँड्सच्या संघाने श्रीलंकेला मोठा धक्का दिला आहे. नेदरलँडने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ गडी गमावत १८२ धावांचे आव्हान श्रीलंकेसमोर ठेवले. या लक्षाचा पाठलाग करत श्रीलंका लवकर लक्ष गाठेल, असे वाटले होते. मात्र हे लक्ष गाठता गाठता श्रीलंकेच्या नाकी नऊ झाले. श्रीलंकेच्या फलंदाजांना नेदरलँडच्या गोलंदाजीला सामोरे जाता आले नाही. श्रीलंकेच्या संघाने मात्र १८.५ षटकात हार मानली. त्यांना अवघ्या १६१ धावा करत परतावे लागले. तर नेदरलँडने २० धावांनी श्रीलंकेचा पराभव केला.**

टी-२० विश्वचषक २०२४ च्या पर्वाच एकूण २० संघ सहभागी झाले आहेत. तर लवकरच सामन्यांची सुरूवात होणार आहे. हे २० संघ सध्या जोरदार सराव करत आहेत. नेदरलँडविरूद्ध श्रीलंका या एका सराव सामन्यात श्रीलंकेच पारडं जड असल्याचे सर्वांनाच वाटत असताना नेदरलँडच्या संघाने बाजी मारली. स्पर्धेचं नववं पर्व १ जूनपासून सुरु होणार आहे. संघांचे एकूण चार गट असून प्रत्येक गटात पाच संघ आहेत. प्रत्येक गटातील दोन संघ सुपर ८ च्या फेरीत स्थान मिळवतील. याचसाठी झालेल्या श्रीलंकाविरूद्ध नेडरलँडच्या सामन्यात कमकुवत वाटणाऱ्या नेदरलँडने श्रीलंकेला पराभवाचं पाणी पाजलं. सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकत नेदरलँडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रीत केले. मात्र हा निर्णय श्रीलंकेसाठी योग्य ठरला नाही. नेदरलँडच्या प्रभावी गोलंदाजीपुढे श्रीलंकेने हार मानली.

श्रीलंका : वानिंदु हसरंगा (कर्णधार), चॅरिथ असलांका (उपकर्णधार), कुसल मेंडिस, पथुम निसांका, कामिंदु मेंडिस, सदीरा समरविक्रमा, अँजेलो मॅथ्यूज, दासुन शनाका, धनंजय डी सिल्वा, महेश थीक्षाना, डुनिथ वेलालेज, दुष्मंथा चमीरा, नुवान तुषारा, मथीशा पथिराना, दिलशान मदुशंका. नीदरलँड्स: स्कॉट एडवर्ड्स (कर्णधार), आर्यन दत्त, बास डी लीडे, डेनियल डोरम, फ्रेड क्लासेन, काइल क्लेन, लोगन वान बीक, मॅक्स ओ'डोव्ड, माइकल लेविट, पॉल वॅन मीकेरेन, साइब्रॉंड अँगेलब्रेक्ट, तेजा निदामानुरु, टिम प्रिंगल, विक्रम सिंह, विव किंग्मा, वेस्ले बॅरेसी.

### भारतासाठी आली गुड न्यूज

टी-२० विश्वचषक स्पर्धेस १ जूनपासून सुरुवात होणार आहे. जो अमेरिका आणि वेस्टइंडीज या देशात होणार आहे. या स्पर्धेआधीच आयसीसीने नवीन टी-२० क्रमवारी जाहीर केली आहे ज्यात काही बदल पाहायला मिळत आहेत. ही क्रमवारी जाहीर झाल्यावर भारतीय संघासाठी आता एक आनंदाची बातमी समोर आली आहे. टी-२० फलंदाजीच्या क्रमवारीत भारतीय संघाचा मधल्या फळीतील फलंदाज सूर्यकुमार यादव ८६१ गुणांसह पहिल्या क्रमांकावर आहे.

गोलंदाजीच्या क्रमवारीत अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, रवी बिश्नोई यांना फायदा झाला आहे. अर्शदीप सिंगने तीन स्थानावरून झेप घेत १६ व्या क्रमांकावर आपले स्थान मिळवले आहे. तर रवि बिश्नोई आणि अक्षर पटेल यांना एका स्थानाचा फायदा झाला आहे. श्रीलंकेचा महीश थीक्षणा ६५९ गुणांसोबत चौथ्या क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलियाचा जोश हेजलवूड ६५४ गुणांसह सहाव्या क्रमांकावर आहे. आफगाणिस्तानचा राशिद खान ६४५ गुणांसोबत सातव्या क्रमांकावर आहे. राशिदने दोन स्थानांची झेप घेतली आहे. अक्षर पटेलला गोलंदाजीच्या क्रमवारीत एका स्थानाचा फायदा झाला आहे आणि तो तिसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. इंग्लंडचा गोलंदाज आदिल राशिद ७२२ गुणांसोबत क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहे. अक्षर आदिल राशिदपासून ६२ गुणांनी मागे आहे. श्रीलंकेचा गोलंदाज वानिंदु हसरंगा ६८७ गुणांसह क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

आयसीसी टी-२० क्रमवारीत इंग्लंड संघाचा कर्णधार जोस बटलरला एका स्थानाचा फायदा झाला आहे. जोस बटलर फलंदाजीमध्ये टी-२० क्रमवारीत सातव्या क्रमांकावर आहे. जोस बटलरला एकूण ७११ गुण मिळाले आहेत. तर वेस्ट इंडीजचे बँडन किंग ७०४ गुणांसोबत आठव्या क्रमांकावर आहे. बँडनला पाच स्थानाचा फायदा झाला आहे. साऊथ आफ्रिकेचा राइली रुसोला ३ स्थानाचे नुकसान झाले आहे. तो दहाव्या क्रमांकावर घसरला आहे. टी-२० फलंदाजीच्या क्रमवारीतील टॉप ६ मध्ये कोणताही बदल झालेला नाही

# ऑस्ट्रेलियन क्रिकेटर जो बर्न्स दुसऱ्या देशाकडून क्रिकेट खेळणार

## सोशल मीडियावर पोस्ट करत बर्न्सने दिली माहिती

।सिडनी ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज






**ऑस्ट्रेलियन क्रिकेटशी संबंधित एक मोठी बातमी समोर आली आहे. ऑस्ट्रेलियाच्या स्टार खेळाडू आता आता दुसऱ्या देशात स्थायिक होणार असून तो त्या देशातून क्रिकेट खेळणार आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत या खेळाडूने ही मोठी माहिती दिली आहे.**

ऑस्ट्रेलियाचा स्टार फलंदाज जो बर्न्सने आपल्या करिअरबाबत मोठा निर्णय घेतला आहे. जो बर्न्सने खुलासा केला आहे की तो त्याच्या शानदार क्रिकेट कारकिर्दीत एक नवीन अध्याय सुरू करत आहे. फेब्रुवारीमध्ये अॅडलेडमध्ये दक्षिण आस्ट्रेलियासोबत शेफिल्ड शिल्डच्या आठव्या फेरीच्या लढतीसाठी क्वीन्सलँडसाठी बर्न्सची निवड झाली नाही. त्याच दरम्यान त्याच्या भावाचे निधन झाले. त्यानंतर एप्रिलमध्ये, बर्न्सला क्वीन्सलँडच्या २०२४-२५ मधील कराराच्या यादीतून वगळण्यात आले. यानंतर आता त्याने दुसऱ्या देशासाठी खेळण्याचा आपला निर्णय जाहीर केला आहे.

जो बर्न्सने सोशल मीडियावर पोस्ट केले करत सांगितले की तो आगामी २०२६ च्या टी-२० विश्वचषक पात्रता स्पर्धेसाठी इटलीच्या राष्ट्रीय संघाकडून खेळणार आहे आणि आपल्या दिवंगत भावाचा स्मरणार्थ तो त्याच्या जर्सी ८५ क्रमांकाची जर्सी घालणार आहे. बर्न्सने लिहिले की, 'हा फक्त एक नंबर नाही आणि ही फक्त जर्सी नाही. हे माझ्या जवळच्या व्यक्तीसाठी आहे जो वरून अभिमानाने खाली खेळताना मला पाहणार आहे. या वर्षी फेब्रुवारीमध्ये माझ्या भावाचे दुःखद निधन झाले. तो जेव्हा सब-डिस्ट्रीक्ट नॉर्दर्न फेडरलकडून खेळला होता तेव्हा त्याचा जर्सी क्रमांक ८५ होता आणि त्याचे जन्म सालही हेच होते.'

बर्न्सने पुढे लिहिले की, 'माझ्या भावाच्या मृत्यूनंतरचे दिवस, आठवडे आणि महिने मी कधीही कल्पना करू शकत नव्हतो. मला माहित आहे की हे टीशर्ट मला कायम तो सोबत असल्याची जाणीव करून देईल आणि मला शक्ती देईल. लहानपणी त्याच्यासोबत तासन तास क्रिकेट खेळल्याने या खेळावर मला प्रेम करायला शिकवले. बर्न्सने पुढे आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, २०२६ च्या विश्वचषकासाठी इटलीचे प्रतिनिधित्व करताना मला खूप अभिमान वाटतो.'

जो बर्न्सने ऑस्ट्रेलियासाठी एकूण २३ कसोटी सामने आणि ६ एकदिवसीय सामने खेळले. कसोटी सामन्यांमध्ये त्याने ३६.९७ च्या सरासरीने १४४२ धावा केल्या, ज्यात ५ अर्धशतके आणि ४ शतके आहेत. यासोबतच त्याच्या नावावर एकदिवसीय क्रिकेटमध्ये २४.३३ च्या सरासरीने १४६ धावा आहेत. जो बर्न्सने २०२० मध्ये ऑस्ट्रेलियाकडून शेवटचा सामना खेळला होता.

### स्पर्धेचे आयोजन करतेय इटली

९ ते १६ जून दरम्यान रोममधील दोन मैदानांवर खेळल्या जाणाऱ्या क्वालिफायर अ उप-प्रादेशिक स्पर्धेचे आयोजन इटली करत आहे. फ्रान्स, आयल ऑफ मॅन, लक्झेंबर्ग आणि तुर्कीसह इटलीचा अ गटात समावेश आहे, तर ब गटात ऑस्ट्रिया, हंगेरी, इस्रायल, पोर्तुगाल आणि रोमानिया यांचा समावेश आहे. दोन्ही गटातील अव्वल संघ प्रादेशिक अंतिम फेरीत पोहोचतील, जिथे त्यांचा सामना इतर उप-प्रादेशिक स्पर्धांच्या विजेत्यांशी होईल. त्या प्रादेशिक अंतिम फेरीतील अव्वल दोन संघ २० संघांच्या २०२६ मधील टी-२० विश्वचषकासाठी युरोपच्या गटातील पात्रता संघ म्हणून पुढे जातील. ज्याचे आयोजन त्या वर्षी नोव्हेंबरमध्ये भारत आणि श्रीलंका येथे केले जाईल.